ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal
A Peer Reviewed Referred Journal

Volume–IX, Issues–II
March – April 2022

Original Research Article

# भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील 'केसरी' ह्या वर्तमानपत्राचे योगदान

**डॉ. राजश्री प्रदीप कदम**

*डॉ तात्यासाहेब नातू कला व वरिष्ठ वाणिज्य महाविद्यालय ,मार्ग ताम्हाणे ,महाराष्ट्र*

**सारांश**

*अव्वल इंग्रजी कालखंडामध्ये इंग्रजी सत्तेच्या विरोधात जनजागृती करण्याचे महत्त्वाचे कार्य वर्तमानपत्रांनी केलेले दिसते.टिळकांनी सुरु केलेल्या 'केसरी' ह्या वर्तमानपत्राने स्वातंत्र्याच्या चळवळीत दिलेले योगदान शोधणे हा उद्देश प्रस्तुत संशोधनामागे आहे.टिळकांनी केसरीमधून विविध विषयांवर चिंतनगर्भ, प्रबोधनपर लेखन करून जनजागृतीची मशाल पेटती ठेवली.स्वराज्याचा ध्यास,स्वदेशीचा अंगीकार, राष्ट्रीय बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण ह्या विचारसुत्रांचा प्रभावी प्रचार करून,इंग्रजांच्या लुटारू धोरणाबाबत समाजात जागृती केली. स्वराज्य आणि सुराज्य ह्यातील फरक स्पष्ट करून इंग्रजांचे राज्य जरी सुराज्य वाटले तरी ते फसवे आहे भारतीयांचे शोषण करणारे आहे, हा फरक केसरीतील लेखांमधून जनतेला समजला. "स्वराज्याची तहान सुराज्याने भागायची नाही" असा क्रांतिकारक विचार समाजात रुजविला. इंग्रजांचे व्यापरी धोरण अन्याय कारक असून भारतीयांना लुबाडणारे आहे. ह्या साठी स्वदेशी वस्तूंचा पुरस्कार करणे आवश्यक आहे, ही जाणीव समाज मनात रुजवून इंग्रजांची आर्थिक कोंडी करण्याचे कार्य केसरीतील लेखांनी केले आहे.स्वदेशीची चळवळ हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग आहे. आणि म्हणून हे स्वदेशीचे व्रत लोकांनी अंगीकारावे असे आग्रही प्रतिपादन केसरी मधील अनेक लेखांमधून करून स्वातंत्र्यलढ्यासाठी पूरक वातावरण तयार केले.जुलमी इंग्रज राज्यकर्त्यांना शह द्यायचा असेल तर राष्ट्रीय बहिष्कार हा एकमेव उपाय आहे. असे प्रतिपादन टिळकांनी केसरीमधून सातत्याने केले.*

*राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार राष्ट्रीय शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रवादी जाणीव निर्माण होऊन देशाला स्वतंत्र करण्याची भावना निर्माण होईल म्हणून राष्ट्रीय शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे,हा विचार केसरीतील लेखांनी समाजापर्यंत पोहचविला होता.*

*समाजमनात स्वातंत्र्यप्राप्तीचे स्फुल्लिंग चेतवण्याचे कार्य केसरीतील लेखांनी केले आहे.सर्व दृष्टीने थंड गोळा बनलेल्या समाजमनाला जागृत करून स्वातंत्र्यलढ्यासाठी पूरक वातावरण निर्माण करण्याचे कार्य केसरी मधील लेखांनी केले आहे.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## प्रस्तावना

प्रस्तुत शोधनिबंधात इंग्रजांविरोधीच्या स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीची पुनर्बांधणी करणारे, समाजमनाला जागृत करणारे, अनेक तरुणांच्या मनात पारतंत्र्याविषयी चीड निर्माण करणारे, त्यांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्यासाठी प्रेरणा देणारे जे लेखन प्रसिद्ध झाले अशा निवडक लेखांचा परामर्श घेतला आहे. हे लेख पुढीलप्रमाणे आहेत १) स्वराज्य आणि सुराज्य २) स्वराज्य ३) स्वदेशी आणि मि. वाच्छा ४) स्वदेशीवरील आक्षेप ५) स्वदेशी आणि बहिष्कार यांचा वाढदिवस ६) बहिष्कार ७) राष्ट्रीय बहिष्कार ८) बहिष्कार योग ९) राष्ट्रीय शिक्षण. समाजमनात स्वातंत्र्याबद्दलची जाज्वल्य आकांक्षा निर्माण करण्याच्या हेतूने प्रस्तुत लेख निर्माण झालेले दिसतात.

१ एप्रिल १९०७ रोजी केसरीमध्ये प्रसिध्द झालेल्या 'स्वराज्य आणि सुराज्य' ह्या लेखात टिळकांनी स्वराज्य आणि सुराज्य ह्या दोन संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करून ह्या दोन्हीतील फरक स्पष्ट करत व्यापाराच्या निमित्ताने आलेले इंग्रज भारतीयांचे सर्व बाजूने शोषण करीत आहेत त्याचे परीक्षण केले. आणि अशी जुलमी राजवट उलथवून लावणे आवश्यक आहे असे नी:संदिग्ध प्रतिपादन केले."स्वराज्याची तहान सुराज्याने भागायची नाही" ह्या एका अमेरिकन पंडिताचे दादाभाई नौरोजींनी राष्ट्रीय सभेमध्ये उद्धृत केलेल्या वचनाचा संदर्भ घेऊन टिळकांनी प्रस्तुत लेखाची मांडणी इतक्या प्रभावीपणे केली की ते विधान टिळकांच्याच नावे ओळखले जाऊ लागले.

स्वराज्य आणि सुराज्य ह्या संकल्पनांचा अर्थ विशद करताना टिळकांनी दुसऱ्या बाजीरावाची राजवट आणि इंग्रजांची राजवट ह्याची तुलनात्मक मांडणी केली आहे. दुसऱ्या बाजीरावाची राजवट स्वराज्याची होती परंतु अनागोंदी प्रशासनामुळे ते सुराज्य होऊ शकले नाही. दुसऱ्या बाजीरावाची प्रशासनावर बिलकुल पकड नव्हती. त्याच्या प्रशासनांमुळे त्रस्त झालेल्या त्याच्याच जनतेने सुराज्याच्या अपेक्षेने इंग्रजांची परकी राजवट फारशी खळखळ न करता स्वीकारली. इंग्रजांनी आधुनिक शिक्षणपद्धती, रेल्वे, टपाल, छपाई ह्यांसारख्या सुधारणा आणून लोकांना नवी दृष्टी दिली. इंग्रजांनी प्रशासकीय सोयीसाठी निर्माण केलेल्या सुव्यवस्थित कायदे कानूनांमुळे लोकांना सुरक्षितता मिळाली. साहेबाच्या राजवटीत काठीला सोन बांधून कुठेही जावे अशी आश्वासकता जनतेला मिळाली. म्हणूनच तेव्हा बाजीरावाचे राज्य जावून इंग्रजाचे राज्य आले ह्याचे लोकांस फारसे वाईट वाटले नाही. ब्रिटीशांच्या प्रशासनामुळे सुराज्याची तहान भागली परंतु स्वातंत्र्य मात्र गमवावे लागले. म्हणूनच ते स्वराज्य नाही अशी 'स्वराज्य' ह्या संकल्पनेची मांडणी टिळकांनी अंत्यंत सुबोधपणे केली आहे. सामान्य माणसाच्या दृष्टीने स्वराज्य म्हणजे आपले राज्य. परंतु एवढाच त्याचा अर्थ नाही. आपले ह्या शब्दात आपल्या जातीचे, धर्मियांचे, आपल्या सरदारांचे राज्य असा अर्थ निघू शकतो. परंतु स्वराज्य हे सुराज्य असेलच असे नाही. स्वराज्य ह्या शब्दाचा एक अर्थ 'सुव्यवस्थित राज्य' आणि दुसरा अर्थ 'सुखकारक राज्य' असा होतो. ह्या दुसऱ्या अर्थाने पेशवाईच्या अखेरीस स्वदेशी बाजीरावाचे राज्य असूनही ते प्रजेसाठी सुखकारक नव्हते म्हणून त्यास स्वराज्य म्हणता येत नाही. स्वराज्य ह्या शब्दाचा अर्थ 'स्व' म्हणजे प्रजा तिच्या मताप्रमाणे चालणारे राज्य. प्रजापक्षाच्या तंत्राने चालणारे राज्य त्यास स्वराज्य म्हणावे. प्रजासत्ताक राज्याखेरीस खरे स्वराज्यच नाही हे मत टिळकांनी प्रस्तुत लेखात अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे.आणि इंग्रजांचे राज्य कितीही सुव्यवस्थित असले तरी प्रजेच्या भल्याचे नाही. इंग्रजांनी देशातील व्यापार धंदे बुडवले. देशातील मोठ-मोठ्या पगाराच्या जागांवर फक्त गोऱ्या लोकांची नेमणूक केली. त्यामुळे प्रशासनातील भारतीयांचा सहभाग कमी होत गेला. लष्करी खात्याचा अवाढव्य खर्च भागवण्या करता जमिनीवरील सारा वाढवून कराच्या रूपाने लोकांना लुबाडले जावू लागले. अशा राज्याला स्वराज्य तर म्हणता येत नाहीच, एव्हढेच नव्हे तर तर सुराज्य ही ठरत नाही. "राज्यपद्धती नुसती शिस्तवार असेल पण ती सुखकारक नसेल. तर तुरुंगाची शिस्त ज्याप्रमाणे जाचक वाटते त्याप्रमाणे इंग्रजी राज्यातील शिस्तीने कायद्याने आणि नियमाने प्रजा चोहोकडून आटून गेली आहे. टिळकांनी स्वराज्य ह्या शब्दाचा स्व म्हणजे ज्याचा तो किंवा लोक अथवा एकंदर प्रजा, आणि त्यांचे म्हणणे त्यांच्या सल्ल्याने चालणारे जे राज्य ते स्वराज्य असा खुलासा करून इंग्रजी सत्ता कशी जुलमी आहे, सुराज्याच्या नावाखाली इंग्रज जनतेची कशी दिशाभूल करत आहेत.इंग्रजांच्या राजनीतीची सोदाहरण चिकित्सा करून, स्वराज्य प्राप्त करण्याचे महत्त्व सुबोधपणे ह्या लेखात विशद केले आहे.

३० नोव्हेंबर १९१५ रोजी केसरीतून प्रसिद्ध झालेल्या 'स्वराज्य' ह्या लेखाद्वारे टिळकांनी ॲनी बेझंट ह्यांनी पुरस्कृत केलेल्या 'होमरूल लीग' ह्या चळवळीचे महत्त्व विशद करून भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीला गती देण्याचे महत्त्वाचे कार्य साध्य केलेले दिसते. टिळकांनी होमरूल चळवळ म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीस नवचैतन्य देणारी चळवळ असून आपल्या देशाचा राज्यकारभार करण्याचा अधिकार प्राप्त करून घेणे म्हणजे होमरूल होय असे ठाम मत मांडले.कॉंग्रेसने होमरूल चळवळीचा कार्यक्रम स्वीकारावा अशी मागणी

केसरीतील लेखाद्वारे अतिशय प्रभावीपणे मांडली. पहिल्या महायुद्धात ब्रिटीशांना भारतीयांनी केलेल्या सहकार्याबद्दल ब्रिटिशांकडून जास्त राजकीय हक्क मिळाले पाहिजेत असे आग्रही प्रतिपादन केसरीतील लेखांमधून केले. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीला अधिक गती देऊन सर्वसामान्य जनतेच्या मनात राजकीय हक्काची जाणीव निर्माण करून स्वयंशासनाचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचविले. होमरूल चळवळीचे स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्व जाणून टिळकांनी केसरीतून सातत्याने जनजागृती केली. टिळकांच्या ह्या भूमिकेमुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याची सूत्रे टिळकांकडे आली. ॲनी बेझंट ह्यांना १५ जून १९१७ ला अटक करण्यात आली. इंग्रजांनी अमानुषपणे दडपशाही सुरु केली. टिळकांनी केसरीमधून सातत्याने ह्या दडपशाहीच्या विरोधात जनमत जागृत करण्याचे कार्य केले. ह्याचा परिणाम म्हणून मॉटेग्यू ह्यांनी २० ऑ गस्ट १९१७ ला भारताला जबाबदार सरकार देण्याचे मान्य केले. भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्याची प्रक्रिया सुरु झाली. १७ मार्च १८९६ रोजी केसरीतून प्रसिद्ध झालेल्या ‘स्वदेशी आणि मि.वाच्छा’ ह्या लेखाद्वारे ब्रिटीशांची कुटील अर्थनीती जनतेपुढे आणली.स्वदेशी वस्तू वापरण्याबद्दलच्या चळवळीबाबत मि.वाच्छा ह्यांनी उपस्थित केलेले काही मुद्दे ह्या चळवळीला खीळ घालणारे होते. मि.वाच्छा ह्या चळवळीच्या विरोधात नव्हते परंतु त्यांनी मांडलेल्या मतानुसार विलायती कपड्यांवर बहिष्कार टाकल्यास भारतातील कोट्यावधी जनतेला पुरेल एवढे कापड स्वदेशी बाजारपेठ पुरवू शकणार नाही. ह्या मुद्द्याला उत्तर देताना टिळकांनी प्रस्तुत लेखात म्हटले आहे, “वाच्छा यांचे धोरण ह्या बाबतीत कसे चुकले ते आम्हांस समजत नाही. हिंदुस्थानातील सर्व लोकांस पुरेल इतका कपडा देशी गिरण्यात आज तयार होत नाही म्हणून देशी कपडा वापरण्याची चळवळ करू नये हे म्हणणे असमंजसपणा आहे. व हाच न्याय दुसरीकडे लागू केला तर सर्व राजकीय, सामाजिक व औद्योगिक चळवळी बंद ठेवाव्या लागतील. मि.वाच्छा ह्यांस माहित आहेच की काँग्रेस सरकारने सुचविलेल्या राजकीय सुधारणा अमलात येण्यास आणखी कित्येक वर्ष लोटतील पण ह्याबद्दल चळवळी करण्याचे आम्ही सोडून दिले आहे का? मग तोच न्याय प्रकृतस्थली का लागू करू नये?” आणि म्हणूनच स्वदेशीची चळवळ येथील धनिक आणि गरीब ह्या सर्वांच्याच हिताची आहे आणि इंग्रजांची कुटील अर्थनीती हाणून पाडणारी आहे. असे स्वदेशीच्या चळवळीचे महत्त्व त्यांनी केसरीतील तीन लेखांमधून सविस्तरपणे मांडून स्वदेशीच्या चळवळीला गती दिली.उदा. ‘स्वदेशीवरील आक्षेप ह्या लेखात टिळकांनी स्वदेशीच्या चळवळीवर घेतलेल्या विविध आक्षेपांचा परामर्श घेतला आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाचा मार्ग म्हणून स्वदेशी चळवळीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. टिळकांनी हे जाणले होते. त्यांनी ह्या चळवळीचे महत्त्व विशद करताना म्हटले आहे “स्वदेशी चळवळ ही एक दुष्काळनिवारक मात्राच होय, कारण या चळवळीमुळे खेडेगांवातील उद्योगधंद्यास उत्तेजक येऊन शेतकीवर उदरनिर्वाह करणारांची संख्या कमी होईल, आणि तसे झाले म्हणजे फॅमिन कमिशनने म्हटल्याप्रमाणे वारंवार दुष्काळ पडण्याचा संभवही कमी होईल.” भारताच्या औद्योगिक, राजकीय, सामाजिक, नैतिक किंवा सांपत्तिक स्थितीबाबत सर्व दिशांनी विचार केल्यास स्वदेशी चळवळ ही उपयुक्तच ठरणारी आहे. स्वदेशीच्या वापरामुळे आपोआपच इंग्रज सरकारच्या आर्थिक नाड्या आवळल्या जातील. स्वदेशीच्या चळवळीमुळे येथील लोकांना रोजगार मिळेल. जरी स्वदेशीचा माल महाग असला तरी त्यातून मिळणारे उत्पन्न हे आपल्या देशातच राहील. स्वदेशीचा मार्ग सुखाचा नाही पण इंग्रजसरकारला जेरीस आणायचे असेल तर स्वदेशीचे खडतर व्रत अवलंबावेच लागेल. स्वदेशीची चळवळ हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग आहे. आणि म्हणून हे स्वदेशीचे व्रत लोकांनी अंगीकारावे असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केसरी मधील अनेक लेखांमधून केले आहे.

‘स्वदेशी आणि बहिष्कार’ ह्या लेखामध्ये भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाचे ठरलेले एक तंत्र म्हणजे ‘बहिष्कार.’ ह्या तंत्राचे महत्त्व प्रस्तुत लेखात टिळकांनी विशद केले आहे. इंग्रजांचा मुख्य हेतू होता व्यापार. लॉर्ड मेकॉलेने असे म्हटले होते “इंग्रजी शिक्षणामुळे हिंदी लोक पुढे मागे स्वतंत्र होतील. हिंदुस्थानातील लोक स्वतंत्र होऊन त्यांचे स्वदेशी राजे विलायती तलवारी आणि विलायती पोशाख चढवून येथे

आमच्या ऐवजी राज्य करू लागले तरी बेहत्तर आहे.” पृ.२  याचाच अर्थ एकवेळ इंग्रज आपली सत्ता भारतीयांना देतील पण व्यापार त्यांच्या हाती जाऊ देणार नाहीत. भारताचे स्वातंत्र्य आणि येथील औद्योगिक सुधारणा ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत असे ठसवण्याचा प्रयत्न इंग्रज सरकार सातत्याने करत होते. इंग्रजांच्या ह्या कुटील व्यापारी धोरणावर टिळकांनी प्रस्तुत लेखामध्ये प्रकाश टाकला आहे. स्वदेशी आणि बहिष्कार ही तंत्रे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला पूरकच आहेत. हे स्पष्ट करताना टिळकांनी म्हटले होते. की स्वदेशी आणि बहिष्कार ह्या तंत्रांमुळे इंग्रजांची मॅचेस्टर आणि लँकेशायर ही औद्योगिक शहरे ठप्प होतील ह्याची जाणीव इंग्रजांना आहे. हिंदुस्थान देशाने राजकीय बाबतीतच नव्हे तर उद्योगधंद्यांच्या बाबतीतही सदैव इंग्लंडचे गुलाम होऊन राहावे ही इंग्रजांची राजनीती आहे. बहिष्काराच्या तंत्रामुळे इंग्लंडमधून होणारी आयात कमी झाली आहे. इंग्रजांच्या उदयोधंद्याला हादरे बसू लागले आहेत. आणि म्हणूनच इंग्रज सरकार स्वदेशी आणि बहिष्काराची चळवळ दडपू पहाते आहे. आणि म्हणूनच हिंदुस्थानातील लोकांनी हे जाणले पाहिजे की स्वदेशी आणि बहिष्कार हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा महत्त्वाचा भाग आहे. लोकांमध्ये स्वदेशाभिमान जागृत करणे आणि त्यांच्यात एकजूट निर्माण करणे हे स्वदेशी आणि बहिष्कार ह्या तंत्राचे मोठे फायदे आहेत. इंग्रजांना इथून घालवायचे असेल तर स्वदेशी आणि बहिष्कार हे उपाय योजावेच लागतील. २२ ऑगस्ट, १९०५ रोजी केसरीतून प्रसिद्ध झालेल्या ‘राष्ट्रीय बहिष्कार’ ह्या लेखात बहिष्काराचे स्वातंत्र्यलढ्याला होणारे फायदे विशद केले आहेत. कलकत्ता येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेत विलायती मालावर बहिष्कार टाकण्याचा ठराव मंजूर झाला. आणि इंग्रज सरकारने तो दडपण्याचा प्रयत्न केला. ह्यातच बहिष्कार ह्या तंत्राचे महत्त्व सामावले आहे. स्वदेशी मालाचा वापर वाढला तर हिंदी लोकांमध्ये स्वाभिमान, करारीपणा येऊन एकराष्ट्रीयत्वाची कल्पना प्रबळ होईल ही भीती लॉर्ड कर्झनसारख्या धूर्त व्हाइसरायच्या लक्षात आल्यामुळे त्याने बंगालच्या फाळणीचा घाट घातला. बंगालची फाळणी करून हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वास धक्का देण्याचा प्रयत्न केला. अशा ह्या जुलमी इंग्रज राज्यकर्त्यांना शह द्यायचा असेल तर राष्ट्रीय बहिष्कार हा एकमेव उपाय आहे. असे प्रतिपादन टिळकांनी केसरीमधून सातत्याने केले. स्वदेशी उद्योगधंदे सुरु झाल्यास राष्ट्राची औद्योगिक व राजकीय स्थिती सुधारेल यात आम्हास शंका वाटत नाही. असे प्रतिपादन करून भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील बहिष्कार तंत्राचे महत्त्व लोकांमध्ये रुजवले.

१२ सप्टेंबर, १९०५. रोजी केसरीतून प्रसिद्ध झालेल्या ‘बहिष्कार-योग’ ह्या लेखात बहिष्कार ह्या तंत्राचा इंग्रज सरकारच्या विरोधात अनेक प्रकारे उपयोग करता येईल हे मत विविध उदाहरणांच्या आधारे टिळकांनी प्रभावीपणे मांडले आहे. हिंदुस्थानसारख्या सर्व  बाजूंनी पांगळ्या झालेल्या देशास आपले अस्तित्त्व सिद्ध करण्यास जर कोणता मार्ग उरला असेल तर तो ‘राष्ट्रीय बहिष्कार’ हाच आहे. अमेरिकेत चीनी लोकांना निट वागवत नाहीत म्हणून चीनने अमेरिकन मालावर बहिष्कार टाकला. त्यामुळे अमेरिकन सरकारला मोठे नुकसान झाले आहे असे ‘पायोनियर’ ह्या वृत्तपत्राने म्हटले आहे. ही स्थिती हिंदुस्थानात निर्माण झाल्यास इंग्रज सरकारलाही शह बसू शकतो आणि म्हणूनच लोकांनी बहिष्कार तंत्राचा पुरेपूर वापर करून स्वदेशीच्या चळवळीला सर्व जनतेने पाठींबा द्यावा असे प्रतिपादन केले आहे. यासाठी निश्चयाची गरज आहे. बहिष्कार-योग कठीण आहे पण तो प्रयत्नपूर्वक साध्य केल्यास इंग्रजांना जेरीस आणणे अशक्य नाही.

२७ फेब्रुवारी, १९०८ रोजी केसरीतून प्रसिद्ध झालेल्या ‘राष्ट्रीय शिक्षण’ या लेखातून इंग्रज सरकारच्या मतलबी शैक्षणिक धोरणाचा परमर्श घेतला आहे. इंग्रजी शिक्षण हे फक्त कारकून निर्माण करणारे असून येथील लोकांना वैद्यकीय, तांत्रिक, प्रशासकीय  ज्ञान मिळाले तरी त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण व्हावी, धर्मशिक्षण मिळावे त्याची तजवीज नाही. इंग्रजी शिक्षण घेणाऱ्यांना आपला धर्म तुच्छ वाटू लागला आहे. विद्यार्थ्यांना देशाच्या स्थितीची ओळख होत नाही. आणि म्हणूनच राष्ट्रीय शिक्षणाची गरज आहे. आमच्या तरुणांना धर्माचे, नीतीचे, उद्योगधंद्याचे, देशस्थितीचे, आपल्या हक्काचे ज्ञान मिळावे याकरता राष्ट्रीय शिक्षण पाहिजे. आणि ह्यासाठीच सरकारी शाळांवर बहिष्कार घालून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या खाजगी शाळा सुरु होणे आवश्यक आहे. इंग्रजी शिक्षण येथील तरुणांची स्वतंत्रपणे विचार

करण्याची शक्तीच हिरावून घेते आहे. आमच्या तरुणांना इंग्रजी शिक्षण घेतल्यानंतर स्वतःबद्दल फाजील अभिमान वाटू लागतो. त्यांना शेती, व्यापार ही कामे हलक्या दर्जाची वाटू लागतात. असे तरुण देशकार्यास नालायक ठरतात. राष्ट्रीय शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रवादी जाणीव निर्माण होऊन देशाला स्वतंत्र करण्याची भावना निर्माण होईल म्हणून राष्ट्रीय शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ह्यासाठी सर्व प्रकारचे ज्ञान मराठी भाषेत येणे आवश्यक आहे. इंग्रजी भाषा शिकण्यास अवघड असल्यामुळे अनेक वर्ष ती भाषा शिकण्यास खर्ची पडतात. तेच ज्ञान मातृभाषेत असेल तर लवकर आत्मसात करता येते. देशात कर्तबगार, कर्ते पुरुष निर्माण व्हायचे असतील तर राष्ट्रीय शिक्षण घेणे अनिवार्य आहे. सरकारची कोणतीही मदत न घेता जे ज्ञान सरकारी शाळांमधून इंग्रज देतात तेच ज्ञान आम्हीही देणार. पण ते इंग्रजांच्या कृपेने मिळाले असे होता कामा नये. हे स्पष्ट करताना टिळकांनी पुढील उदाहरण दिले आहे "राष्ट्रीय शाळेत आम्ही "दोन आणि दोन चार" हेच शिकविणार, पण त्याच्याबरोबर "दोन आणि दोन चार" हे आम्हांस इंग्रज सरकारच्या कृपेमुळे समजले असे म्हणतां येऊ नये, अशी आम्ही तजवीज करणार आहोत." हिंदुस्थानचा खरा इतिहास इंग्रजांनी आम्हाला कसे लुटले, येथील उद्योगधंदे कसे नाहीसे केले, आम्हाला गुलाम कसे केले ह्या सर्व बाबींची जाणीव शिक्षणाने होणे गरजचे आहे. हल्लीची परिस्थिती कशी बदलता येईल ह्याबाबत विचार करणारे तरुण राष्ट्रीय शाळांमधून तयार व्हावे ज्यामुळे प्राप्त परिस्थिती बदलता येईल. बंगाल, पंजाब, मद्रास ह्या ठिकाणी अशा शाळा सुरु झालेल्या आहेत. महाराष्ट्रातही राष्ट्रीय शिक्षण रुजावे जेणेकरून स्वतःचे भले करत असतानाच राष्ट्रकार्यही पार पाडण्याची क्षमता तरुणांमध्ये निर्माण होईल.

१९ ऑगस्ट, १९०२ रोजी केसरीतून प्रसिद्ध झालेल्या 'सरकारी हमालखाने' ह्या लेखातून इंग्रजांनी सुरु केलेल्या शिक्षण पद्धतीतील त्रुटींचा परामर्श टिळकांनी घेतला आहे. इंग्रजी शिक्षण सुरु झाले तेव्हा प्रारंभी इंग्रजी विद्या शिकलेल्या लोकांना सरकारात उच्चपदस्थ जागा मिळू लागल्या त्यामुळे इंग्रजी शिक्षणाचा उदो उदो करणारी एक पिढी निर्माण झाली. नंतर मात्र इंग्रजी शिक्षणातील एकांगीपणा लक्षात येऊ लागला. इंग्रजांनी तयार केलेल्या शिक्षणक्रमातून फक्त सरकारी नोकरीस लागणारे आवश्यक गुणच भारतीयांच्या ठिकाणी निर्माण व्हावे अशी योजना केलेली होती. आणि म्हणूनच इंग्रज सरकारने सुरु केलेल्या शाळा म्हणजे सरकारी हमालखाने आहेत. असे मत टिळकांनी प्रस्तुत लेखातून मांडले. इंग्रजांनी सुरु केलेल्या शिक्षण पद्धतीतील त्रुटी आणि त्याचा तत्कालीन तरुणांवर होणारा विपरीत परिणाम टिळकांनी प्रस्तुत लेखातून अतिशय परखडपणे मांडलेला दिसतो.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याबाबत जनजागृती करण्याचे कार्य टिळकांनी केसरीच्या माध्यमातून केले. स्वातंत्र्य चळवळीला पूरक ठरणाऱ्या सर्व मार्गांची चिकित्सा करून लोकांपर्यंत तिचे महत्त्व पोहोचविले. स्वराज्याची आकांक्षा सामान्य जनतेच्या मनात जागी करण्याची , जनतेच्या विचारांना नवी दिशा देऊन त्यांना चळवळीत सक्रीय  करण्यासाठी टिळकांनी केसरीचे व्यासपीठ तयार केले. स्वराज्य ,स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ह्या चतु:सूत्रीचा पुरस्कार करण्याचे कार्य केसरीतील टिळकांच्या लेखांमुळे साध्य झाले.म्हणूनच भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या यशस्वितेमधील 'केसरी' मधील  टिळकांच्या लेखनाचे महत्व सुवर्णाक्षरांनी नोदाविले गेले आहे.

**संदर्भ सूची :**

लोकमान्य टिळक) १९९६' (स्वराज्य आणि सुराज्य '

लोकमान्य टिळकांचे निबंध( संपा.राम शेवाळकर ) नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया नवी दिल्ली पृ. ७

लोकमान्य टिळक (१९९६) 'स्वदेशी आणि मि.वाच्छा' लोकमान्य टिळकांचे निबंध (संपा.राम शेवाळकर ) नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया नवी दिल्ली पृ. १८

तत्रैव पृ. २१

लोकमान्य टिळक (१९९६) ‘स्वदेशी आणि बहिष्कार’ लोकमान्य टिळकांचे निबंध ( संपा.राम शेवाळकर ) नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया नवी दिल्ली पृ.२

लोकमान्य टिळक (१९९६) ‘राष्ट्रीय शिक्षण’ लोकमान्य टिळकांचे निबंध( संपा.राम शेवाळकर ) नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया नवी दिल्ली पृ. ६५

***Cite This Article:***

**डॉ. राजश्री प्रदीप कदम ,** *(2022).* **भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील ‘केसरी’ ह्या वर्तमानपत्राचे योगदान,** *Educreator Research Journal IX (II) Mar-April, 85-90.*